17

# राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार

**प्रा.डॉ. फुलचंद सुर्यभान दुधभाते**
जवाहर महाविद्यालय, अणदूर
ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

***********

**प्रस्तावना :-** शाहु महाराजांचे पूर्वीचे नाव यशवंत होते. ते घाटगे घराण्यातून दत्तक गेले होते. अत्यंत हुशार आणि कल्पक बुध्दीचे, पुरोगामी विचारांचे, समतावादी दृष्टीचे आपल्या राज्यात समतेचा झेंडा त्यांनी रोवला. शिक्षण व विवाह झाल्यानंतर त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली होती आणि शेतक-याचा, कामक-यांचा आधुनिक राजा म्हणून नाव लौकीक मिळविला.

त्यांच्या समतावादी दृष्टीने तत्कालीन उच्चवर्णीयांना हादरा बसला होता. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक चांगल्या गोष्टी घडून येत होत्या. त्यांच्या शिक्षणविषयक तळमळीने कोल्हापूरात शिक्षणाची गंगा अवतरली. सामान्य जणाना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. सामान्य माणसापर्यंत शिक्षण पोहचवण्याचा छत्रपती राजाराम महाराज यांचा विचार शाहु महाराजानी प्रत्यक्षात उतरवला.

शाहू महाराजांची शिक्षणविषयक विचाराची बैठक महात्मा फुले यांच्या विचारावर आधारलेली होती. शिक्षणपासून वंचित असलेल्यांचा विकास करावा हा विचार मनोमन ठरवून शाहू महाराजानी शिक्षणाविषयक विचारांना चालना दिली होती.

शाहू महाराजानी विशीष्ट जातीच्या हाती असलेली शिक्षणाची मक्तेदारी मोडीत काढून ते सर्वापर्यंत पोचविले. त्यासाठी त्यानी सक्तीची शिक्षण मोहिम राबविली. जातीनिहाय वस्तीगृहाची स्थापना केली. शिक्षणातून नव्या समाजाची निर्मिती करण्याचा महाराजांचा प्रयत्न होता. कुठल्याही जातीच्या मुलाला शिक्षण मिळावे, त्याचा विकास व्हावा हे महाराजांचे ध्येय होते. शेतकऱ्याची मुले सुध्दा शिक्षणाच्या प्रवाहात आले पाहिजे असे त्याना वाटत होते. त्यांच्या भाषणातून त्यानी जो शिक्षणविषयक विचार मांडला त्यातून त्यांची सार्वत्रिक शिक्षणाची तळमळ स्पष्ट पणे दिसून येते.

**उद्दिष्टये :-** शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार जाणून घेणे

शाहू महाराज यांचे शिक्षणविषयक विचार हे त्यांच्या शैक्षणिक भाषणातून आणि जाहीरनाम्यातून वेळोवेळी प्रकट झालेले आहेत. शिक्षणाविषयी अभिरूची निर्माण करणे आणि शिक्षण ही अवघ्या परिवर्तनाची गंगोत्री आहे. याचे भान सर्व सामान्याच्या मनात रूजविणे हे शाहू महाराजाना अभिप्रेत होते. केवळ शिक्षण देणे आणि शिकलेल्या माणसांना सुशिक्षित म्हणून घ्यायला संधी मिळवून देणे एवढाच कांही शाहू महाराजाच्या शिक्षणविषयक चळवळीचा भाग नव्हता. समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा व दारिद्य नष्ट करण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे, असे शाहु महाराजांना वाटत होते.

डॉ.एस.एस.भोसले यानी शाहू महाराजांची शिक्षणाविषयक चळवळ खालील तीन पायावर उभी होती असे प्रतिपादन केले.

१. शिक्षणविषयक सोयी सवलती, शिक्षण संस्थाची निर्मिती, शिक्षण संस्थाना मदत शिक्षणविषयक वेगवेगळया उपक्रमांचे संयोजन इत्यादी सोयी उपलब्ध करून देणे.

२. विविध जाती जमातीसाठी विद्यार्थी वसतीगृहाची सोय करून शिक्षणाच्या प्राप्तीचे मार्ग सोयिस्कर करणे, वसतीगृह युक्त शिक्षणाला उत्तेजन देऊन जातीभेद नाहीसे करणे.

३. सामान्य माणसाच्या मनामध्ये शिक्षणाविषयी अभूतपूर्व लालसा निर्माण करून त्यांच्या अनेकविध मागासलेपणाला सुरूंग लावणे.[१]

या वरील तीन पायावर शाहु महाराजानी शिक्षणविषयक क्रांती घडवून आणली. राजर्षी शाहू महाराजांचे 'व्यापक समाजशिक्षण' हे शिक्षणविषयक विचारांचे पहिले सूत्र होते. सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विविध शिक्षणविषयक प्रयोग करून विविध स्वरूपाचे शिक्षण देणाऱ्या शाळा उघडून समाजमनाला शिक्षणाची गोडी लावण्याचे महत्वाचे कार्य शाहु महाराजानी करून शैक्षणिक चळवळीला व्यापक स्वरूप दिले.

**राजर्षी शाहू महाराजांची शैक्षणिक भाषणे :-**

राजर्षी शाहू महाराजांना विविध प्रसंगी जी भाषणे दिली त्यातून त्यांचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट होत जातात. ते खालीलप्रमाणे पाहता येतील. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या ११ व्या अधिवेशनात खामगाव येथे शाहु महाराजानी केलेल्या भाषणात शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे.[२] असे ठामपणे सांगितले होते. तसेच पुढील भाषणात, अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मत्सुद्दी व लढवय्ये, वीर कधीही निपजणार नाहीत. महणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे."[३]

या अंधारी रात्रीचे विश्लेषण शाहु महाराजानी मनुच्या जाचक रूढी परंपरेतून, धर्म बंधनातून सर्व सामान्याना शिक्षणाची द्वारे बंद





Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

झाली होती. त्या संदर्भात परामर्श घेऊन ब्रिटीश सरकारच्या आगमनामुळे शिक्षणाची द्वारे सर्वांसाठी खुली आहेत. हा महत्वाचा मुद्दा प्रतिपादन करून ब्रिटीशांच्या शिक्षणविषयक धोरणामुळे शाहु महाराजांनी त्यांचे ऋणच व्यक्त केले आहे.

शाहू महाराजांच्या भाषणात जेव्हा जेव्हा भाषणात शिक्षणविषयक विचार येत असत तेव्हा तेव्हा त्यानी व्यापक समाजशिक्षणामागील भूमिका स्पष्ट करून इंग्रजी राजवटीमुळे सर्वसामान्याना शिक्षणाची दारे खुली झालेली आहेत व त्याचा फायदा सर्वांनी घेतला पाहिजे ही भूमिका मांडत असत.

**सक्तीची सार्वजनिक शिक्षणविषयक योजना**

शिक्षण घेऊन रयत सुधारली पाहिजे आणि तिने लोकशाहीचा पुरस्कार केला पाहिजे. समाज साक्षर झाला तरच लोकशाहीला डोळसपणा येऊ शकतो. डोळस लोकशाहीच देशाला चांगले दिवस आणू शकते. यासाठी लोकाना शिक्षणाचे महत्व पटले नाही. तर ते आपण जिद्दीने, कळकळीने प्रेमाने, जिव्हाळयाने आणि ममतेने लोकाना पटवून दिले पाहिजे. निरक्षर लोक आपणापर्यंत आले नाहीत तर आपण त्यांच्यापर्यंत गेले पाहिजे. त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले पाहिजे. ज्ञानाचे अभिसरण सर्व समाजात व्हावे असा विचार शाहु महाराजानी उराशी बाळगले होते. अशा अभिसरणासाठीच शाहु महाराजाना मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची गरज वाटत होती.

शाहू महाराजाच्या सार्वत्रिक सक्तीच्या शिक्षणाच्या प्रयोगाला सुरूवात झाली. परंतू प्रारंभी शाळांच्या पटसंख्येत फारशी वाढ झाली नाही लोकामध्ये अजूनही शिक्षणाबद्दल अज्ञान होते. त्याचबरोबर प्राथमिक शिक्षकाच्या पगारात सात रूपयावरून नऊ रूपये वाढ केली त्यामुळे शिक्षकातही उत्साह व नवचैतन्य निर्माण झाले.

३० सप्टेबर १९१७ रोजी गणेश चतूर्थीच्या मुहुर्तावर सक्ती शिक्षण मोहिमेचा नारळ फुटला . ३० सप्टेबर १९१७ ते ३१ मार्च १९१८ या काळात २७ सक्ती शाळा सुरू केल्या. पहिली शाळा चिखली, पेटा करवीर येथे काढण्यात आल्या.

राज्यातील सर्व जनतेला शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी वेगवेगळया शाळा उघडल्या आश्रमशाळा, पुरोहित शाळा, युवराज शाळा, उद्योगशाळा, संस्कृत शाळा, सैनिक शाळा, कला शाळा, अशा पध्दतीने आपापल्या आवडीनुसार उद्योग, व्यवसाय शिक्षण घेण्याची सोय शाहु महाराजानी केली होती.

राजर्षी शाहू महाराजांच्या या विचाराचा प्रभाव समाजावर अनुकूल झाला. शिक्षणाचा प्रसार झाला. सर्व जातीजमातीच्या मुलाना शिक्षण घेता आले. त्यामुळे लोकशाही बळकट होण्यास मदत झाली. शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारानी, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रयोगाने शिक्षणक्षेत्राला जी गती प्राप्त झाली तिचे चांगले परिणाम पुढे शिक्षण क्षेत्राच्या विकासाच्या रूपात पहावयास मिळतात.

**संदर्भ : -**

१. कुमार अनिल- राजर्षी शाहु महाराज - मॅकमिलन इंडिया लिमिटेड, पुणे
२. भगत रा.तु- लोकराजा शाहु महाराज व्यक्तित्व आणि विचार - योगेश प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती
३. भगत रा.तु- राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण
४. डॉ.नाईक तु.बा.- छत्रपती राजर्षी शाहू महाराज
५. डॉ.भोसले एस.एस. महाराष्ट्राचे शिक्षण :- प्रयोग व परंपरा - शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे, षष्ठाब्दपूर्ती समिती प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती , १९८०
६. प्रशासकीय अहवाल - १९१८-१९१९, पृष्ठ- ४५
७. सुर्यवंशी कृ.गो- राजर्षी शाहू : राजा व माणूस - ठोकळ प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृष्ठे -१८७
८. नाईकवाडे अशोक - राजर्षी छत्रपती शाहू महाराज : गौरव ग्रंथ -पृष्ठ ७१
९. प्रशासकीय अहवाल -१९९३-९४
१०. धनंजय कीर - राजर्षी शाहू छत्रपती

❑❑❑



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad